# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
# Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University

सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
©: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०

परीक्षा व मूल्यमापन मंडळ Board of Examinations and Evaluation


जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/ 1054
Ref. No. : PAHSU/BOEE/

दिनांक :
Date : 19 JUL 2022

## परिपत्रक – 54

प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य / मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक, विद्यापीठ संकुलातील संचालक / परीक्षा केंद्राचे संचालक /अंतर्गत व बहि:स्थ पर्यवेक्षक यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, मार्च / एप्रिल -२०२२ च्या परीक्षा सद्यस्थितीत विविध परीक्षा केंद्रावर सुरु आहेत. या परीक्षा व्यवस्थितपणे सुरु व्हाव्यात याकरिता विद्यापीठाने वेळोवेळी विविध परिपत्रके निर्गमित केलेले आहेत व सूचना देखील दिलेल्या आहेत. या परिपत्रकाअन्वये वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचनांचे पालन बहुतांशी महाविद्यालय व परीक्षा केंद्राकडून होत आहे. परंतू काही परीक्षा केंद्रामध्ये विद्यापीठाकडून पाठविण्यात आलेल्या प्रश्नपत्रिका वेळेत डाऊनलोड करुन घेतल्या जात नसल्याचे निर्दशनास येत आहे. प्रश्नपत्रिका वेळेत डाऊनलोड केल्यानंतर विद्यार्थी संख्येनुसार त्यांच्या प्रिंट काढणे व परीक्षा वेळेत घेणे ही ज्या त्या परीक्षा केंद्राची जबाबदारी आहे, परंतू तसे काही परीक्षा केंद्रावर होतना दिसून येत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका वेळेवर उपलब्ध होत नसल्याने परीक्षा सुरु होण्यास विलंब होत आहे, त्याप्रमाणे विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी वेळही वाढवून द्यावा लागत आहे.

विद्यापीठाने विविध परीक्षा केंद्राकडून आलेल्या सूचनानुसार पहिल्या सत्रातील पेपर सुरु होण्याच्या अगोदर दोन तास आणि पुढील सत्रातील सर्व पेपर तीन तास अगोदर आपल्या लॉगीनवर पाठविले जात आहेत. त्यानुसार महाविद्यालयातील परीक्षा केंद्रातील **IT Co-ordinator** यांनी विहीत वेळेत प्रश्नपत्रिका डाऊनलोड करुन या प्रश्नपत्रिकेमध्ये एकूण ५० प्रश्न आहेत का ?, सर्व प्रश्नांना पर्याय दिलेले आहेत किंवा नाही, वेळापत्रकानुसार व SLR नुसारच पेपर असल्याची खातरजमा करुन मगच सदरचा पेपर ज्या त्या वर्गामध्ये वितरीत करण्यात यावा. यासंदर्भात काही तांत्रिक अडचण असल्यास विद्यापीठाने खाली काही हेल्पलाईन नंबर दिलेले आहेत त्यांच्याशी संपर्क साधावा.

| अ.क्र. | हेल्पलाईन प्रतिनिधीचे नाव | मोबाईल नंबर |
|---|---|---|
| १. | श्री. निखील मेश्राम | ९६६५९५४२३९ |
| २. | श्री. राहूल लोखंडे | ८०१००८५७५९ |
| ३. | श्री. एकनाथ काळे | ८०१००८३७६२ |
| ४. | श्री. अमोल केंदळे | ८०१००७६६५७ |
| ५. | श्री. शुभम अंबेवाले | ८०१००९३८३१ |

संबंधीत परिपत्रक हे मार्च / एप्रिल २०२२ परीक्षा सुरळीतपणे व निकोप पार पाडण्याकरीता निर्गमित होत असून याचे सर्व परीक्षा केंद्रांनी तंतोतंत पालन करुन विद्यापीठास सहकार्य करावे.

(डॉ. शिवकुमार एस. गणपूर)
मा.संचालक,